loknayak 11.01.2026 - Copy - :Copy of Layout 1 1/10/2026 10:46 PM Page 1

बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → रविवार दि. ११ जानेवारी २०२६ → वर्ष १० वे → अंक -१८३ → पाने ४ + ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Sunday Date: 11 January 2026 → 10 th Year → 183 Paper → Pages : 4+4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
संपादक – भारत गायकवाड

# मी इथे गडाचा सेवेकरी म्हणून आला



**गहिनीनाथगड इथं मला मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथगडाचा सेवक, वामनभाऊंचा भक्त म्हणून निमंत्रण दिलं आहे. मी वामनभाऊंचा आशिर्वाद घेण्यासाठी गडावर आलो आहे आणि मी सातत्याने वामनभाऊंचा आशिर्वाद घेण्यासाठी गडावर येत राहील, असे म्हणत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गहिनीनाथगडाच्या विकासाची सर्व जबाबदारी आम्ही घेतलेली आहे. गडाचा विकास असाच अविरत सुरू राहणार आहे. आता गहिनीनाथगड ते पंढरपूर हा पालखी रस्ता लवकरच होईल, असे आश्वासन देत वामनभाऊंना वाचा सिद्धी होती. ते जे बोलत होते ते होत होतं. त्यांनी समाजातील सर्व वर्गाला भक्ती मार्गाला लावले, असे प्रतिपादन या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांनी केले.**

## गहिनीनाथगड-पंढरपूर पालखी रस्ता करू -मुख्यमंत्री






**लोकनायक वृत्तसेवा –** संत वामनभाऊ यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त गहिनीनाथगडावर आले होते. या वेळी गडाचे मुख्य मठाधिपती ह.भ.प. विठ्ठल महाराज, राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, आ.धनंजय मुंडे, आ. सुरेश धस, मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे यांच्यासह आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संत वामनभाऊ महाराजांनी समाजाला अध्यात्माचा लळा लावला. समाजात एकोपा आणला.मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होतं, हा संदेश दिला. अगदी चोरांनाही उपदेश दिला. त्यामुळे चोर चोरी सोडून वारकरी झाले.वामनभाऊंचा अध्यात्मिक,सामाजिक, सर्वक्षेत्रातला परिवर्तन विकासाचा आवाका मोठा पान २ वर

# श्री क्षेत्र मंजरथ येथे सहस्त्र ब्राह्मण भोजन सोहळ्याचे आयोजन

**लोकनायक वृत्तसेवा –** माजलगाव तालुक्यातील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र मंजरथ येथे श्री चिन्मयमूर्ती संस्थान, उमरखेड यांच्या वतीने माजलगाव तालुक्यात प्रथमच होत असलेल्या सहस्त्र ब्राह्मण भोजन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.हा धार्मिक




प.पू.श्री.माधवानंद महाराज
मठाधिपती, चिन्मयमूर्ती संस्थान,उमरखेड

व सांस्कृतिक उपक्रम सोमवार, दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, या निमित्ताने वैदिक परंपरेनुसार धार्मिक विधी, मंत्रोच्चार व त्यानंतर सहस्त्र ब्राह्मणांना सन्मानपूर्वक भोजनदान केले जाणार आहे. या पवित्र सोहळ्याच्या निमित्ताने परिसरातील पान २ वर

# दिपक धन्वे हे राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्काराने सन्मानित!

**लोकनायक वृत्तसेवा –** आंतरराष्ट्रीय नामांकन (आय एस ओ ९००१-२०१५) प्राप्त 'हिंदी मराठी पत्रकार संघ' द्वारा आयोजित ' राज्यस्तरीय दर्पणरत्न पुरस्कार २०२६ या पुरस्काराने दिपक विलास धन्वे यांना सन्मानित करण्यात आले आहे.

कला (गायन) क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी दिपक धन्वे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

हिंदी मराठी पत्रकार संघ व दर्पण वृत्तपत्राद्वारे सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यासाठी 'राज्यस्तरीय दर्पण रत्न



पुरस्काराचे' आयोजन करण्यात येते. यामध्ये पत्रकारिता, शिक्षण, साहित्य, सामाजिक, खेळ, राजकीय, सौंदर्य, डॉक्टर , वकील ,महिला, सहकार, पतसंस्था, कला , इत्यादी




क्षेत्रात कर्तृत्व घडवणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येते. यामध्ये बीड तालुक्यातील कळसंबर येथील गायक दिपक धन्वे यांनी आपल्या सुमधूर आवाजाने लोकांचे मनोरंजन करत , लोकांच्या मनावर एक वेगळीच छाप निर्माण केली आहे. याच कलेची दखल घेऊन. कला क्षेत्रातील दर्पण रत्न पुरस्कारा साठी त्यांची निवड करण्यात आली.

दर्पण रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश तायडे सहा. माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. प्रा. अनिल खर्चे (प्राचार्य व्ही. बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज) , तर प्रमुख पाहुणे अशांत भाई वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ , धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, बंडूभाऊ चवरे उद्योजक, बाळासाहेब दामोदर उद्योजक , दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजय डागा, बंडू चौधरी, सुभेदार दिनेश तायडे कारगिल योद्धा, चंद्रकांत वर्मा हे होते.















loknayak 11.01.2026 - Copy - :Copy of Layout 1 1/10/2026 10:46 PM Page 2



# केजच्या विकासाला 'इलेक्ट्रिक' वेग!

## केज शहरात राज्य परिवहन मंडळाचे ई-बस आगार आणि चार्जिंग स्टेशन मंजूर ; आमदार नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला मोठे यश!

महादेव काळे, केज लोकनायक वृत्तसेवा - केज मतदारसंघाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी बातमी समोर आली आहे. केज शहरात आता राज्य परिवहन मंडळाचे (चडठढउ) अद्ययावत ई-बस आगार (ए-ईी ऊर्शीो) आणि चार्जिंग स्टेशन उभारले जाणार आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून, यामुळे केजमधील प्रवाशांचा प्रवास आता अधिक सुखकर, प्रदूषणमुक्त आणि हायटेक होणार आहे. प्रदूषणमुक्त प्रवासाचे नवे पर्व वाढते प्रदूषण आणि इंधनाचे दर पाहता राज्य सरकारकडून इलेक्ट्रिक बसेसवर भर दिला जात आहे. केजमध्ये चार्जिंग स्टेशन आणि ई-बस आगार झाल्यामुळे लांब पल्ल्याच्या आणि स्थानिक मार्गांवर मोठ्या प्रमाणात 'शिवाई' सारख्या इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. यामुळे प्रवाशांना आवाजमुक्त आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि फायदे: अद्ययावत चार्जिंग पॉईंट्स: एकाच वेळी अनेक बसेस चार्ज करण्याची क्षमता असलेले हाय-स्पीड चार्जिंग स्टेशन. सुसज्ज बस आगार: ई-बसेसच्या देखभालीसाठी विशेष वर्कशॉप आणि कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक सोयीसुविधा. पर्यावरण पूरक: डिझेलची बचत होऊन कार्बन उत्सर्जनात घट होईल. रोजगारर संधी: नवीन आगार आणि स्टेशनमुळे स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.'केज मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या भागातील दळणवळण व्यवस्था सुधारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. ई-बस आगारामुळे केजच्या वैभवात



भर पडेल आणि सर्वसामान्यांचा प्रवास अधिक सुखकर होईल.'----नमिता मुंदडा, आमदार, केज विधानसभा.अक्षय मुंदडा यांचेही महत्त्वपूर्ण योगदान या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबी आणि शासनाकडील प्रशासकीय मंजुरीसाठी आमदार नमिता मुंदडा यांच्यासोबतच भाजपचे नेते अक्षय मुंदडा यांनीही विशेष लक्ष दिले होते. या निर्णयामुळे केज तालुक्यातील जनतेमध्ये आनंदाचे वातावरण असून महायुती सरकारच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

महादेव काळे, केज लोकनायक वृत्तसेवा - केज मतदारसंघाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी बातमी समोर आली आहे. केज शहरात आता राज्य परिवहन मंडळाचे (चडठढउ) अद्ययावत ई-बस आगार (ए-ईी ऊर्शीो) आणि चार्जिंग स्टेशन उभारले जाणार आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून, यामुळे केजमधील प्रवाशांचा प्रवास आता अधिक सुखकर, प्रदूषणमुक्त आणि हायटेक होणार आहे. प्रदूषणमुक्त प्रवासाचे नवे पर्व वाढते प्रदूषण आणि इंधनाचे दर पाहता राज्य सरकारकडून इलेक्ट्रिक बसेसवर भर दिला जात आहे. केजमध्ये चार्जिंग स्टेशन आणि ई-बस आगार झाल्यामुळे लांब पल्ल्याच्या आणि स्थानिक मार्गांवर मोठ्या प्रमाणात 'शिवाई' सारख्या इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. यामुळे प्रवाशांना आवाजमुक्त आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि फायदे: अद्ययावत चार्जिंग पॉईंट्स: एकाच वेळी अनेक बसेस चार्ज करण्याची क्षमता असलेले हाय-स्पीड चार्जिंग स्टेशन. सुसज्ज बस आगार: ई-बसेसच्या देखभालीसाठी विशेष वर्कशॉप आणि कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक सोयीसुविधा. पर्यावरण पूरक: डिझेलची बचत होऊन कार्बन उत्सर्जनात घट होईल. रोजगारर संधी: नवीन आगार आणि स्टेशनमुळे स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.'केज मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या भागातील दळणवळण व्यवस्था सुधारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. ई-बस आगारामुळे केजच्या वैभवात भर पडेल आणि सर्वसामान्यांचा प्रवास अधिक सुखकर होईल.'----नमिता मुंदडा, आमदार, केज विधानसभा.अक्षय मुंदडा यांचेही महत्त्वपूर्ण योगदान या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबी आणि शासनाकडील प्रशासकीय मंजुरीसाठी आमदार नमिता मुंदडा यांच्यासोबतच भाजपचे नेते अक्षय मुंदडा यांनीही विशेष लक्ष दिले होते. या निर्णयामुळे केज तालुक्यातील जनतेमध्ये आनंदाचे वातावरण असून महायुती सरकारच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

## पान १ वरून

**मी इथे गडाचा...**

होता.वामनभाऊंना वाचा सिद्धी होती. ते जे बोलत होते ते होत होते.समाजातल्या शेवटच्या व्यक्तींना वामनभाऊंनी कीर्तनातून, विचारातून उपदेश दिला. संतांमध्ये आणि भक्तांमध्ये कुठलाही भेद नसतो म्हणून इथं जे हे कठाडे मोठे केले आहेत ते कमी करण्याचे महाराजांना सांगितले. समोरचा हा मंडप पाहून समाधान वाटल्याचेह फडणविसांनी या वेळी म्हटले. आपण आता पंढरपूरला जागा घेतली आहे, प्रामुख्याने गडाच्या कामाच्या सर्व जबाबदाऱ्या मी आणि व्यासपीठावरील सर्वांनी घेतल्या आहेत. विठ्ठल महाराजांनी गहिनीनाथगड ते पंढरपूर या पालखी रस्त्याबाबत मला सांगितले आहे, तो रस्ताही आपण लवकर करू. मला इथं मुख्यमंत्री म्हणून आमंत्रण दिलं नाही, तर गडाचा भक्त, गडाचा सेवेकरी म्हणून मी इथे आलो आहे. गडाचा अनुयायी म्हणून मी गडावर येत राहील,असेही शेवटी देवेंद्र फडणविस म्हणाले.तर या वेळी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी अवघ्या चार मिनिटांचे भाषण केले.त्या म्हणाल्या, गहिनीनाथगडाच्या सर्वांगीन विकासाचे सर्व श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते

**श्री क्षेत्र...**

भाविक, मान्यवर व ब्राह्मण बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती अपेक्षित आहे. समाजात धार्मिक संस्कार, एकोपा व अध्यात्मिक जाणीव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. याच दिवशी दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असून, सर्व भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान ४ वरून

**आष्टी शहरासाठी १०..**

३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कोतन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, दासखेड ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, घाटशीळ-पारगाव ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, भायाळ या ठिकाणी नव्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असून त्यापैकी आज आष्टी शहरात ट्रान्सफॉर्मर प्रत्यक्ष दाखल झाल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, भाऊसाहेब भवर, महावितरणचे उपअभियंता शिवाजी देशमुख, महेश हंबर्डे, भाऊसाहेब निंबाळकर, सुनील मेहेर, बाळू शेठ मेहेर, भारत मुरकुटे, सुरेश वारंगुळे, विठ्ठल शेंबडे, राजू निकाळजे, बाळासाहेब घोडके, शमशोद्दीन शेख, श्रेयस मेहेर, इरशान खान, अविनाश गिरी, राजेंद्र जोशी, अनंतदेवा जोशी, सुनील रेडेकर, राहुल मुथ्था, मनोज धनवडे, कपिल अग्रवाल, नितीन खिळे, गणेश पोकळे, अजित मुळे, सागर धोंडे, बबलू शेख, सतीश टकले यांच्यासह व्यापारी,पत्रकार,नागरिक,अनेक मान्यवर उपस्थित होते.

**लोकरत्न पुरस्काराने बीड..**

घेतल्यापासून अनेक काम-कुचार अधिकाऱ्यावर तसेच जिल्हा परिषदेमध्ये विविध विभागात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर देखील त्यांनी निलंबनाच्या कारवाया केल्या आहेत.तसेच वेळोवेळी पंचायत समिती असो की जिल्हा परिषदेमधील अनेक विभाग असो अशा जिल्हा परिषदेमधील विविध विभागावर त्यांचे सातत्याने कडक नियंत्रण असते. बीड जिल्हा परिषद आता एक उत्कृष्ट कार्य चांगल्या प्रकारे या जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कामकाज चालत असल्यामुळे सर्व बीड जिल्ह्यातील जनतेमधून आनंद व्यक्त होत आहे. या महत्त्वाच्या अधिकाऱ्याचा देखील लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान सर यांना देखील सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तसेच बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेला लाभलेले इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंडेवाड साहेब यांना देखील लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी येथे उपस्थित असलेले श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत (बीबी) वैद्य साहेब,प्रा. दत्ता रामरुले, माजी नगरसेवक बाबुराव परळकर तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय कुलकर्णी, हे यावेळी उपस्थित होते..

**निष्ठावान कार्यकर्त्यांच्या ..**

अतुल सावे यांच्या गाडीसमोर कार्यकर्त्यांनी घोषणा देत आपला निषेध व्यक्त केला. काही महिला पदाधिकारी यांनी तर चक्क भाजप कार्यालयात उपोषण सुरू केले. एका पक्षात आयात नेत्याला उमेदवारी दिल्याने स्थानिक नगरसेवकांनी पक्ष सोडत दुसऱ्या गटात प्रवेश केला. काही प्रभागांत तर एकाच पक्षाचे दोन-दोन बंडखोर उभे राहिले.पुण्यात ङ्गकॉर्पोरेट राजकारणङ्ग अधिक प्रभावी ठरत आहे. प्रस्थापित आर्थिक गटांच्या पाठबळावर उमेदवार ठरवले जातात, असा कार्यकर्त्यांचा आरोप आहे. यामुळे अनेक जुने कार्यकर्ते निवडणुकीपूर्वीच निष्क्रिय झाले किंवा पक्ष सोडून बसले. मुंबईत पक्षफुटीचे सर्वात मोठे उदाहरण पाहायला मिळाले. शिवसेनेतील फाटाफुटीमुळे एकाच विचारधारेचे कार्यकर्ते परस्परविरोधी गटांत उभे ठाकले. अनेक ठिकाणी मूळ शिवसैनिकांना डावलून बाहेरून आलेल्या नेत्यांना उमेदवारी देण्यात आली. राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या नागपुरातही कार्यकर्त्यांची नाराजी उफाळून आली. पक्षांतर्गत गटबाजी, वरून लादलेले उमेदवार आणि स्थानिक नेतृत्वाची उपेक्षा यामुळे कार्यकर्ते खुलेआम नाराजी व्यक्त करत आहेत. कोल्हापूर, सोलापूर या भागांत पारंपरिक राजकीय घराणी आणि आर्थिक हितसंबंध प्रभावी ठरतात. पक्ष बदलून आलेल्या नेत्यांना लगेच स्वीकारले जाते, मात्र वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ङ्गथांबाङ्ग सांगितले जाते. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत अनेक प्रभागांत बिनविरोध निवडणुकांचे प्रमाण वाढले आहे. विरोधकांनी उमेदवारच उभे न करण्यामागे राजकीय 'सेटिंग' असल्याची चर्चा उघडपणे होते.

अलीकडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर नगरसेवक बिनविरोध निवडून येताना दिसले. राजकीय निरीक्षकांच्या मते, हे केवळ लोकप्रियतेमुळे होत नाही, तरङ्घ विरोधी पक्षांनी शेवटच्या क्षणी उमेदवार मागे घेणे प्रभाग वाटपात ङ्गअदृश्य समझोतेङ्घ

आर्थिक व राजकीय दबाव भविष्यातील सत्तावाटपाचे आश्वासन या माध्यमातून निवडणुका ङ्गमॅनेजङ्घ केल्या जातात. प्रश्न असा आहे की, जेव्हा पक्षांत एवढे मतभेद, बंडखोरी आणि फुटी आहेत, तेव्हा राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष असतानाही निवडणूक बिनविरोध कशी काय होते?

हे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक लक्षण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

राज्यात सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार आहे त्यामुळे त्यांच्याकडे उमेदवारी मागणाऱ्यांची गर्दी जास्त आहे मात्र विरोधी बाकांवर असलेले काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांचीही अवस्था वेगळी नाही. सर्वच पक्षांत कार्यकर्त्यांची घुसमट वाढते आहे.याशिवाय

महाराष्ट्रातील आगामी महापालिका निवडणुकांत लोकशाहीची गळचेपी होत असून राजकीय पक्षांमधील घराणेशाही पुन्हा एकदा उघडपणे समोर आली आहे. भाजप, काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), मनसे तसेच इतर प्रादेशिक पक्षांनीही निष्ठावान, संघर्षशील कार्यकर्त्यांना डावलून नेतेमंडळींच्या पत्नी, मुले, भाचे, जावई आणि निकटवर्तीय नातेवाईकांना उमेदवारी दिल्याचे दिसत आहे.

रस्त्यावर उतरून पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तोंडाला पाने पुसली जात असून, ङ्गपक्ष नव्हे तर कुटुंब महत्त्वाचेङ्घ अशीच भूमिका सर्वच पक्षांनी घेतल्याचे चित्र आहे. सत्ता असो वा विरोध, घराणेशाहीच्या बाबतीत कोणताही पक्ष अपवाद राहिलेला नाही, हे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.

शहरी स्वराज्य संस्थांमधून नवीन नेतृत्व घडवण्याची संधी असताना ती संधी पुन्हा एकदा राजकीय घराण्यांच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यामुळे सामान्य कार्यकर्ते हतबल झाले असून अनेक ठिकाणी बंडखोरी, अपक्ष उमेदवारी आणि पक्षविरोधी काम उघडपणे सुरू झाले आहे.

लोकशाही, पारदर्शकता आणि तळागाळातील नेतृत्व घडवण्याच्या घोषणा करणारे हेच पक्ष प्रत्यक्षात मात्र घराणेशाहीला खतपाणी घालत असल्याची तीव्र टीका राजकीय वतुर्ळात होत आहे. ङ्गनिष्ठा, काम आणि जनाधार नव्हे तर आडनाव आणि ओळख महत्त्वाची,ङ्घ अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये खोलवर रुजत चालली आहे.

मनपा निवडणुका या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कणा मानल्या जातात. मात्र त्या संस्थाही जर राजकीय घराण्यांच्या खासगी मालमत्तेसारख्या वापरल्या जाणार असतील, तर लोकशाहीचा आत्माच धोक्यात येईल, असा इशारा जाणकारांकडून दिला जात आहे.

आता प्रश्न एवढाच आहे की, घराणेशाही विरोधात जाहीरपणे बोलणारे मतदार प्रत्यक्ष मतदानातून तरी या प्रवृत्तीला धक्का देणार का, की पुन्हा एकदा राजकीय कुटुंबांचीच सत्ता अबाधित राहणार.?

पक्षासाठी रक्त आटवण्याची गरज उरली आहे का?

पक्षनिष्ठेपेक्षा पक्षांतर हेच यशाचे सूत्र झाले आहे का?

मेहनतीपेक्षा आर्थिक ताकदच महत्त्वाची ठरणार असेल, तर कार्यकर्त्यांनी का झटावे?

जर ही परिस्थिती अशीच राहिली, तर उद्या पक्षांकडे झेंडे उचलणारे कार्यकर्ते उरणार नाहीत. राजकीय पक्ष केवळ निवडणूक जिंकणारी यंत्रणा बनतील. निष्ठावान कार्यकर्त्यांच्या नशिबी जर कायम सतरंज्याच राहिल्या, तर हेच कार्यकर्ते भविष्यात पक्षांना सत्तेच्या दारात पोहोचवणार नाहीत. हा प्रश्न केवळ पक्षांचा नाही, तर महाराष्ट्रातील लोकशाहीच्या आरोग्याचा आहे ङ्घआणि तो इशारा आता स्पष्टपणे दिसतो आहे.

**जालना शहराचा महापौर भाजपाचा ..**

माजी आमदार कैलास गोरंटयाल, भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, भाजप प्रदेश सचिव राहुल लोणीकर, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे यांच्यासह राजेश राऊत, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, धनराज काबलिये आदी मान्यवर उपस्थित होते.मतदारांशी संवाद साधताना ना. बावनकुळे म्हणाले की, ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना जालना शहरात प्रभावीपणे राबविण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. विकासाच्या चारचाकी गाडीला केंद्रातील मोदी सरकार, राज्यातील फडणवीस सरकार तसेच रावसाहेब पाटील दानवे, आ. बबनराव लोणीकर, माजी आमदार कैलास गोरंटयाल आणि भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वाची मजबूत साथ आहे.भाजपाची सत्ता महापालिकेत आल्यास गायरानावरील तसेच अतिक्रमणग्रस्त नागरिकांना कोणतीही शासकीय फी न घेता मोफत पीआर कार्ड देण्यात येईल. यासंदर्भातील पहिला ठराव महापालिकेत घेऊन तो एका महिन्याच्या आत मुख्यमंत्री महोदयांकडून मंजूर करून घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.तसेच जालना शहरातील मालमत्तेच्या संरक्षणाची जबाबदारी भाजप सरकार घेईल. केंद्र शासनाच्या माध्यमातून शहरात १५ हजार घरे मोफत देण्यात येतील. प्रत्येक घराला प्रधानमंत्री सूर्यघर योजनेचा लाभ देण्यात येईल व पुढील १५ वर्षांपर्यंत वीज बिल शून्य येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजयी करा. विकास कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे आवाहन ना. बावनकुळे यांनी यावेळी केले.यावेळी प्रभाग क्रमांक ७ मधील भाजपाचे अधिकृत उमेदवार राजेश राऊत, सुनील खरे, पार्वती देशमाने, स्नेहलता कामड तसेच प्रभाग क्रमांक १४ मधील उमेदवार सौ. रमा काळे, अशोक (लक्ष्मीकांत) पांगारकर, सुलोचना गोर्डे, शशिकांत घुगे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. जर तुम्हाला ही बातमी अधिक लहान, ठळक मथळ्यांसह, किंवा विशिष्ट वृत्तपत्राच्या शैलीत हवी असल्यास तसे सांगू शकता

**.स्वच्छ आणि सुंदर जालन्यासाठी..**

काळे यांनी बाजारपेठेतील सर्वप्रतिष्ठांनाना भेटी देऊन काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे राहण्याचे आवाहन केले. रॅलीच्या समारोपप्रसंगी खासदार काळे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न सोडवण्यासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध आहे. भिस्तीपुरा भागातील पुराची समस्या असो वा शहरातील स्वच्छता, काँग्रेसचा पंजाच यावर योग्य उपाय आहे. या रॅलीत नागरिकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, प्रभाग ६ मध्ये बदलाचे वारे वाहत असल्याचे निश्चित झाले आहे.

लोकनायक

रविवार दि. ११ जानेवारी २०२६



# निष्ठावान कार्यकर्त्यांच्या नशिबी सतरंज्याचः!

## मनपा निवडणुकीत बिनविरोध निवड,घराणेशाहीचा उच्छाद, सर्वच पक्षांची निष्ठावान कार्यकर्त्यांशी गद्दारी

**पी. रविकांत दानम (जालना)**
**मोबाईल ९४०४०४०५२२**

**लोकनायक वृत्तसेवा** – महाराष्ट्राच्या राजकारणात आज एक गंभीर आणि धोकादायक प्रवाह वेगाने रुजताना दिसतो आहेङ्गतो म्हणजे निष्ठावान कार्यकर्त्यांची पद्धतशीर उपेक्षा आणि पक्षांतर करणाऱ्या नेत्यांचे लाड. गेली २० ते ३० वर्षे पक्षासाठी झटणारे, आंदोलनात पुढे राहणारे, निवडणुकीत जीव ओतणारे कार्यकर्ते आज स्वतः च्याच पक्षात दुय्यम ठरत आहेत. त्यांच्या नशिबी सत्तेऐवजी सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे.ही अवस्था केवळ एका पक्षापुरती मर्यादित नाही. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार व शरद पवार गट), शिवसेना (एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे गट), मनसे, जवळपास सर्वच पक्षांमध्ये 'आयात संस्कृती' बोकाळली आहे. ङ्गजिंकण्याची क्षमताङ्ग, ङ्गआर्थिक ताकदङ्ग, ङ्गसमाजगणितङ्ग, ङ्गसेटिंगङ्ग या कारणांवर पक्षांतर करून आलेल्या उमेदवारांना थेट तिकीट दिले जाते. परिणामी, पक्षाशी निष्ठावान कार्यकर्त्यांच्या मनात प्रचंड असंतोष खदखदतो आहे.संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिका निवडणुकांदरम्यान भारतीय जनता पक्षाच्या माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड आणि राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या गाडीसमोर कार्यकर्त्यांनी घोषणा देत आपला निषेध व्यक्त केला. काही महिला पदाधिकारी यांनी तर चक्क भाजप कार्यालयात उपोषण सुरू केले. एका पक्षात आयात नेत्याला उमेदवारी दिल्याने स्थानिक नगरसेवकांनी पक्ष सोडत दुसऱ्या गटात प्रवेश केला. काही प्रभागांत तर एकाच पक्षाचे दोन-दोन बंडखोर उभे राहिले. पुण्यात ङ्गकॉर्पोरेट राजकारणङ्ग अधिक प्रभावी ठरत आहे. प्रस्थापित आर्थिक गटांच्या पाठबळावर उमेदवार ठरवले जातात, असा कार्यकर्त्यांचा आरोप आहे. यामुळे अनेक जुने कार्यकर्ते निवडणुकीपूर्वीच निष्क्रिय झाले किंवा पक्ष सोडून बसले. मुंबईत पक्षफुटीचे सर्वात मोठे उदाहरण पाहायला मिळाले. शिवसेनेतील फाटाफुटीमुळे एकाच विचारधारेचे कार्यकर्ते परस्परविरोधी गटांत उभे ठाकले. अनेक ठिकाणी मूळ शिवसैनिकांना डावलून बाहेरून आलेल्या नेत्यांना उमेदवारी देण्यात आली. राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या नागपुरातही कार्यकर्त्यांची नाराजी




उफाळून आली. पक्षांतर्गत गटबाजी, वरून लादलेले उमेदवार आणि स्थानिक नेतृत्वाची उपेक्षा यामुळे कार्यकर्ते खुलेआम नाराजी व्यक्त करत आहेत. कोल्हापूर, सोलापूर या भागांत पारंपरिक राजकीय घराणी आणि आर्थिक हितसंबंध प्रभावी ठरतात. पक्ष बदलून आलेल्या नेत्यांना लगेच स्वीकारले जाते, मात्र वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ङ्गथांबाङ्ग सांगितले जाते. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत अनेक प्रभागांत बिनविरोध निवडणुकांचे प्रमाण वाढले आहे. विरोधकांनी उमेदवारच उभे न करण्यामागे राजकीय 'सेटिंग' असल्याची चर्चा उघडपणे होते.अलीकडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर नगरसेवक बिनविरोध निवडून येताना दिसले. राजकीय निरीक्षकांच्या मते, हे केवळ लोकप्रियतेमुळे होत नाही, तरङ्ग विरोधी पक्षांनी शेवटच्या क्षणी उमेदवार मागे घेणे प्रभाग वाटपात ङ्गअदृश्य समझोतेआर्थिक व राजकीय दबाव भविष्यातील सत्तावाटपाचे आश्वासन या माध्यमातून निवडणुका ङ्गमॅनेजङ्ग केल्या जातात. प्रश्न असा आहे की, जेव्हा पक्षांत एवढे मतभेद, बंडखोरी आणि फुटी आहेत, तेव्हा राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष असतानाही निवडणूक बिनविरोध कशी काय होते?हे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक लक्षण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.राज्यात सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार आहे त्यामुळे त्यांच्याकडे उमेदवारी मागणाऱ्यांची गर्दी जास्त आहे मात्र विरोधी बाकांवर असलेले काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांचीही अवस्था वेगळी नाही. सर्वच पक्षांत कार्यकर्त्यांची घुसमट वाढते आहे.याशिवाय महाराष्ट्रातील आगामी महापालिका निवडणुकांत लोकशाहीची गळचेपी होत असून राजकीय पक्षांमधील घराणेशाही पुन्हा एकदा उघडपणे समोर आली आहे. भाजप, काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), मनसे तसेच इतर प्रादेशिक पक्षांनीही निष्ठावान, संघर्षशील कार्यकर्त्यांना डावलून नेतेमंडळींच्या पत्नी, मुले, भाचे, जावई आणि निकटवर्तीय नातेवाईकांना उमेदवारी दिल्याचे दिसत आहे.रस्त्यावर उतरून पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तोंडाला पाने पुसली जात असून, ङ्गपक्ष नव्हे तर कुटुंब महत्त्वाचेङ्ग अशीच भूमिका सर्वच पक्षांनी घेतल्याचे चित्र आहे. सत्ता असो वा विरोध, घराणेशाहीच्या बाबतीत कोणताही पक्ष अपवाद राहिलेला नाही, हे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.शहरी स्वराज्य संस्थांमधून नवीन नेतृत्व घडवण्याची संधी असताना ती संधी पुन्हा एकदा राजकीय घराण्यांच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यामुळे सामान्य कार्यकर्ते हतबल झाले असून अनेक ठिकाणी बंडखोरी, अपक्ष उमेदवारी आणि पक्षविरोधी काम उघडपणे सुरू झाले आहे.लोकशाही, पारदर्शकता आणि तळागाळातील नेतृत्व घडवण्याच्या घोषणा करणारे हेच पक्ष प्रत्यक्षात मात्र घराणेशाहीला खतपाणी घालत असल्याची तीव्र टीका राजकीय वतुर्ळात होत आहे. ङ्गनिष्ठा, काम आणि जनाधार नव्हे तर आडनाव आणि ओळख महत्त्वाची,ङ्ग अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये खोलवर रुजत चालली आहे.मनपा निवडणुका या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कणा मानल्या जातात. मात्र त्या संस्थाही जर राजकीय घराण्यांच्या खासगी मालमत्तेसारख्या वापरल्या जाणार असतील, तर लोकशाहीचा आत्माच धोक्यात येईल, असा इशारा जाणकारांकडून दिला जात आहे.आता प्रश्न एवढाच आहे की, घराणेशाही विरोधात जाहीरपणे बोलणारे मतदार प्रत्यक्ष मतदानातून तरी या प्रवृत्तीला धक्का देणार का, की पुन्हा एकदा राजकीय कुटुंबांचीच सत्ता अबाधित राहणार.?पक्षासाठी रक्त आटवण्याची गरज उरली आहे का?पक्षनिष्ठेपेक्षा पक्षांतर हेच यशाचे सूत्र झाले आहे का?मेहनतीपेक्षा आर्थिक ताकदच महत्त्वाची ठरणार असेल, तर कार्यकर्त्यांनी का झटावे? जर ही परिस्थिती अशीच राहिली, तर उद्या पक्षांकडे झेंडे उचलणारे कार्यकर्ते उरणार नाहीत. राजकीय पक्ष केवळ निवडणूक जिंकणारी यंत्रणा बनतील. निष्ठावान कार्यकर्त्यांच्या नशिबी जर कायम सतरंज्याच राहिल्या, तर हेच कार्यकर्ते भविष्यात पक्षांना सत्तेच्या दारात पोहोचवणार नाहीत. हा प्रश्न केवळ पक्षांचा नाही, तर महाराष्ट्रातील लोकशाहीच्या आरोग्याचा आहे ङ्गआणि तो इशारा आता स्पष्टपणे दिसतो आहे.

# पोरवाल महाविद्यालयात सेठ नेमकुमारजी पोरवाल जयंती

## अर्थात संस्थापक दिवस सोहळा संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा** – कामठी: स्थानिक सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात बुधवार, ७ जानेवारी २०२६ रोजी दिवंगत सेठ नेमकुमारजी पोरवाल यांचा जन्मदिवस संस्थापक दिन म्हणून साजरा करण्यात आला. सेठ नेमकुमारजी पोरवाल यांच्या तैलचित्राला मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री.अजयजी अग्रवाल अध्यक्ष, कामठी नगरपरिषद, प्रमुख पाहुणे मा. प्रा. डॉ. मनोहर कुंभारे, संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर, श्री. राजकिरण बर्वे, अध्यक्ष नगरपंचायत येरखेडा, दि शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. अखिलजी पोरवाल, कोषाध्यक्ष श्री. अभिमन्युजी पोरवाल, सचिव श्री. विजयकुमारजी शर्मा, सीईओ प्रा. डॉ . सुधाकर धोंडगे, प्राचार्य प्रा. डॉ. स्वप्नील दाहात, कार्यक्रम समन्वयक व उपप्राचार्य प्रा. डॉ. मनीष चक्रवर्ती या मान्यवरांच्याहस्ते पुष्पांजली अर्पण करू विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रास्तविकात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. स्वप्नील दाहात यांनी महाविद्यालयच्या ६० वर्ष आढावा सांगतांना महाविद्यालय स्थापनेचा हिरक जयंती महोत्सव साजरा करत असून आहे. महाविद्यालयाच्या ५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल स्वर्णजयंती महोत्सवाप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब आले होते हा मोठा अविस्मरणीय प्रसंग होता.




नेमकूमाराजीने लावलेल्या औदुंबर वृक्षाचे फळ सतत मिळत असून देश, विदेशात व समाजात महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध उच्च पदे भूषवित आहेत अशी माहिती दिली. डॉ. एस. एस. धोंडगे (सीईओ) यांनी सांगितले की, साठ वर्षाच्या प्रवासात महाविद्यालयांने विविध शिबिरे, चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषद, आयोजित करून विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रेरित केलेले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रो. डॉ.मनोहर कुंभारे यांनी म्हटले की, कामठी सारख्या ग्रामीण भागामध्ये तळागाळातील लोकांसाठी ज्ञानाची परंपरा वृद्धिंगत व्हावी यासाठी नेमकुमारजी पोरवाल यांनी सेठ केसरीमल पोरवाल हे महाविद्यालय निर्माण केले असून आज नागपुर जिल्यातील नव्हे तर मध्य भारतातील एक नामवंत महाविद्यालय म्हणून ते प्रसिद्ध झाले आहे. हिच ज्ञान परंपरा पोरवाल परिवाराने सुरु ठेवून नैतिक मूल्याने सज्ज असे सुजाण नागरिक निर्माण करावेत असे मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अजयजी अग्रवाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून म्हटले की, कामठीत लोकांना रोजगार मिळावा यासाठी पोरवाल परिवाराने कारखाने निर्माण केले तर दुसरीकडे दि शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून पोरवाल महाविद्यालयाच्या रुपात सर्वांसाठी शिक्षणाची दारे उघडलीत. ही कामठी शहरासाठी गौरवाची गोष्ट आहे. संस्थेच्या विकासासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे त्यांनी जाहीर केले.

याप्रसंगी कुमारी अफिफा शाफिया हिला वरिष्ठ महाविद्यालयातील उत्कृष्ट विद्यार्थी तर कनिष्ठ महाविद्यालयातून कुमारी राधा अग्रवाल हिला उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून सुवर्णपदक देण्यात आले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमात परिसरातील गणमान्य व्यक्ति, महाविद्यालयचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. रेणू तिवारी, आय.क्यू.ए. समन्वयक डॉ. प्रशांत धोंगळे, प्रा. डॉ. इफ्तेखार हुसैन, डॉ. तारुण्य मुलतानी, डॉ. जितेंद्र सावजी तागडे, लेफ्टनंट मोहमम्द असरार, डॉ. रश्मी जाचक, डॉ. आशा रामटेके, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुधीर अग्रवाल, पर्यवेक्षक प्रा. विश्वनाथ वंजारी, रजिस्ट्रार स्वप्नील राठोड, किशोर गबड, प्रवीण अंबादे, मंगेश यादव इत्यादींनी कठीण परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गिजाला हाश्मी तर आभार कार्यक्रम समन्वयक प्रो. डॉ. मनिष चक्रवर्ती यांनी केले.

# जामखेड मध्ये गाडीचा हॉर्न वाजवल्याच्या कारणावरून मारहाण व गाड्यांची तोडफफोड सहा जणांवर गुन्हा दाखल

**लोकनायक वृत्तसेवा** – जामखेड मध्ये रस्त्यावरून जात असताना दुचाकी गाडीचा हॉर्न वाजवल्याच्या कारणावरून फिर्यादी सह दोघांना आरोपींनी मारहाण व शिवीगाळ केली यावेळी फिर्यादी सह त्याच्या काही मित्रांनी घाबरून दुचाकी गाड्या जाग्यावरच टाकून पळून गेले. त्यानंतर आरोपींनी त्या ठिकाणी असलेल्या फिर्यादीच्या गाड्यांची तोडफफोड केली. या प्रकरणी एकूण सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी प्रसाद दिनकर राजगुरू वय २३ वर्षे राहणार सुतार गल्ली. जामखेड हा त्याच्या मित्रासह मंगळवार दिनांक सहा रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास बीड कॉर्नर या ठिकाणाहून दुचाकी वर जात होते. यावेळी फिर्यादी प्रसाद राजगुरू यांनी गाडीचा हॉर्न वाजवला या कारणावरून आरोपी सार्थक बळीराम राळेभात, पृथ्वीराज पवार (पूर्ण नाव माहित नाही) शिवम कोल्हे (पूर्ण नाव माहित नाही) महेश भगवान आजबे, साई प्रदीप जाधव व यश पवार (पूर्ण नाव माहित नाही) यांनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांची गाडी अडवली व फिर्यादीस म्हणाले की तुम्ही आमच्या पान टपरी समोर हॉर्न का वाजवला असे म्हणून त्यांनी मोटरसायकल क्रमांक एम एच १६ सी. डब्ल्यू ८८८२ या दोन मोटरसायकल यांची कोणत्या सारख्या हत्याराने तोडफफोड केली. या प्रकरणी फिर्यादी प्रसाद दिनकर राजगुरू राहणार




शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी पृथ्वीराज पवार यांनी पान शॉप मधून कोयता घेऊन आला त्यामुळे फिर्यादी व त्याचा मित्र घाबरून आपल्या दुचाकी जागेवरच सोडून पळून गेले यानंतर फिर्यादीची मोटरसायकल क्रमांक एम एच १६ डी. ई ०८२६ व त्याचा मित्र श्याम अंकुश राजगुरू यांची सुतार गल्ली. जामखेड यांनी दिलेले फिर्यादीवरून वरील सहा जणांवर जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. आहे यातील सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेऊन नंतर जामीनावर सोडण्यात आले पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हे. कॉ शिवाजी कदम हे करीत आहेत

# जामखेड विठ्ठल मंदिर येथे श्री संत जळोजी मळोजी यांची पुण्यतिथी साजरी

## श्री विश्वकर्मा वंशीय सुतार समाज संघटनेतर्फे श्री संत जळोजी मळोजी महाराज यांचे पुण्यतिथीचे आयोजन

**लोकनायक वृत्तसेवा** – जामखेड येथे पौष वैद्य पंचमी दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी श्री विश्वकर्मा वंशीय सुतार समाज संघटनेतर्फे श्री संत जळोजी मळोजी यांची पुण्यतिथी मोठ्या भक्ती भावाने भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ७ ते ८ अभिषेक ८:३० ते १० मिरवणूक १० ते १२, ह भ प मधुकर महाराज केदार यांचा सुमधुर कीर्तनाचा कार्यक्रम व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी जामखेड नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रांजलताई चिंतामणी तसेच अमित शेठ चिंतामणी, नगरसेवक पोपट नाना राळेभात, मनोज काका कुलकर्णी, माजी उपनगराध्यक्ष महेश शेठ निमोणकर, तसेच नगरसेवक मोहन शेठ पवार, सौ नंदाताई होळकर,प्रवीण शेठ होळकर यांच्या हस्ते विठ्ठल मंदिरात महा आरती करण्यात आली या कार्यक्रमासाठी तालुक्यातून सुतार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमासाठी श्री विठ्ठल भजनी मंडळाचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचे तालुका अध्यक्ष आनंद राजगुरू, उपाध्यक्ष संजय बनगे,उपाध्यक्ष गणेश गवळी, सचिव प्रल्हाद



राजगुरू,संघटक गणेश सुतार, प्रमुख मार्गदर्शक पंढरीनाथ राजगुरू तसेच बाळासाहेब जिरेकर,अंकुश राजगुरू, नारायण राजगुरू, कुमार राजगुरू सर,संतोष क्षीरसागर, ज्ञानेश्वर क्षीरसागर, भगवान राजगुरू, सतीश राजगुरू, रंगनाथ राजगुरू आदींनी मोलाचे सहकार्य केले.जभावाने भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ७ ते ८ अभिषेक ८:३० ते १० मिरवणूक १० ते १२, ह भ प मधुकर महाराज केदार यांचा सुमधुर कीर्तनाचा कार्यक्रम व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात

# तथागत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेमार्फत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**लोकनायक वृत्तसेवा** – भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची ३ जानेवारी २०२६ रोजी नालंदा बुद्ध विहार सणसवाडी या ठिकाणी तथागत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सणसवाडी यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनावर तथागत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तात्याराव मोरे संस्थेचे कार्याध्यक्ष पद्माकर थर्डेकर भीम आर्मी शिरूर तालुका सचिव सुनील डोंगरे, तथागत बहुउद्देशी सामाजिक संस्थेचे सदस्य इंद्रजीत लांडगे ,सुनील पाडळे, सुधाकर लोखंडे ,संजय गच्चे, देवलाल भोजने, बिबीशन सूर्यवंशी ,मनोज कसबे ,आणि सोनवणे साहेब इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सक्रिय कार्यकर्ते इंद्रजीत लांडगे यांनाही तथागत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेमार्फत केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# आष्टी शहरासाठी १० एम.व्ही.ए. क्षमतेचा नवा ट्रान्सफॉर्मर दाखल

## १३ आधी व आता ११ एकूण २३ ट्रान्सफॉर्मर मंजूर; मतदारसंघातील वीज प्रश्न कायमचा सुटणार – आ. सुरेश धस

**आष्टी लोकनायक वृत्तसेवा** – यापूर्वी छोटा ट्रान्सफॉर्मर मिळिवण्यासाठीही मोठा संघर्ष करावा लागत होता. मात्र आता राज्याचे ऊर्जा खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्यामुळे आपल्या मतदारसंघात ट्रान्सफॉर्मर सहज आणि वेगाने मंजूर होऊन उपलब्ध होत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महावितरणमध्ये प्रभावी योजना राबविल्या जात असून येत्या काळात शेतकऱ्यांसाठी वीजपुरवठ्याच्या बाबतीत चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.याआधी १३ आणि आता ११ असे एकूण २३ ट्रान्सफॉर्मर मंजूर झाल्याने मतदारसंघातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याचे प्रतिपादन





त्यांनी केले.मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांतील कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर आणि कासार तालुक्यांतील एकूण ११ वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० व ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत.त्याच पार्श्वभूमीवर आज शनिवार (दि. १०) रोजी १० एम.व्ही.ए. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर आष्टी शहरासाठी दाखल झाला. या ट्रान्सफॉर्मरचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले.या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे कृषी पंपांना स्थिर वीजपुरवठा लोडशेडिंग व भार नियंत्रणात सुधारणा कमी व्होल्टेजची समस्या दूर शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत दर्जेदार वीज या सर्व बाबींना मोठा फायदा होणार असून परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही सकारात्मक बदल घडून येणार आहे.१० एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर :३३/११ के.व्ही. उपकेंद्र, आष्टी ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, धानोरा ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर :३३/११ के.व्ही. उपकेंद्र, सावरगाव ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, जळगाव (कडा कारखाना)३३/११ के.व्ही. उपकेंद्र, डोईठाण ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कुसळंब ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लांबरवाडी **पान २ वर**

# लोकरत्न पुरस्काराने बीड जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सन्मान

**बीड जिल्हा पोलीस अधीक्षक मा श्री नवनीत कांवत साहेब, जि. प. बीड चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंटेवाड साहेब यांना लोकरत्न पुरस्कार देऊन केले सन्मानित**

**लोकनायक वृत्तसेवा** – बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांना बाळशास्त्री जांभेकर या दर्पण दिनानिमित्त सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन व लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मा पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांचे काम अतिशय उत्कृष्ट असल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीला हद्दपार




करणारे एकमेव एसपी म्हणून नवनीत कावन साहेब यांच्याकडे सध्या जिल्हावासीय पाहत आहेत. म्हणून त्यांचे कार्य अप्रतिम उत्कृष्ट आहे, म्हणून त्यांना महाराष्ट्रा राज्य लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला तसेच बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान साहेब यांचे देखील जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कर्तव्य अतिशय उल्लेखनीय कार्य आहे.कारण जिल्हा परिषदेचा चार्ज **पान २ वर**

# निष्ठावान कार्यकर्त्यांच्या नशिबी सतरंज्याच!

## मनपा निवडणुकीत बिनविरोध निवड,घराणेशाहीचा उच्छाद, सर्वच पक्षांची निष्ठावान कार्यकर्त्यांशी गद्दारी

**लोकनायक वृत्तसेवा** – महाराष्ट्राच्या राजकारणात आज एक गंभीर आणि धोकादायक प्रवाह वेगाने रुजताना दिसतो आहेङ्गतो म्हणजे निष्ठावान कार्यकर्त्यांची पद्धतशीर उपेक्षा आणि पक्षांतर करणाऱ्या नेत्यांचे लाड. गेली २० ते ३० वर्षे पक्षासाठी झटणारे, आंदोलनात पुढे राहणारे, निवडणुकीत जीव ओतणारे कार्यकर्ते आज स्वतः च्याच पक्षात दुय्यम ठरत आहेत. त्यांच्या नशिबी




सत्तेऐवजी सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे.ही अवस्था केवळ एका पक्षापुरती मर्यादित नाही. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार व शरद पवार गट), शिवसेना (एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे गट), मनसे, जवळपास सर्वच पक्षांमध्ये 'आयात संस्कृती' बोकाळली आहे. ङ्गजिंकण्याची क्षमताङ्ग, ङ्गआर्थिक ताकदङ्ग, ङ्गसमाजगणितङ्ग, ङ्गसेटिंगङ्ग या कारणांवर पक्षांतर करून आलेल्या उमेदवारांना थेट तिकीट दिले जाते. परिणामी, पक्षाशी निष्ठावान कार्यकर्त्यांच्या मनात प्रचंड असंतोष खदखदतो आहे.संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिका निवडणुकांदरम्यान भारतीय जनता पक्षाच्या माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड आणि राज्याचे मंत्री **पान २ वर**

# जालना शहराचा महापौर भाजपाचा करा; शहरवासीयांना मोफत पीआर कार्ड देऊ – ना. चंद्रशेखर बावनकुळे

**लोकनायक वृत्तसेवा** – जालना शहराचा पहिला महापौर भारतीय जनता पार्टीचा करण्यासाठी शहरातील भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजयी करा. भाजपाचा महापौर झाल्यास पहिल्याच बैठकीत शहरातील नागरिकांना शासनाची कोणतीही फीस न घेता मोफत पीआर कार्ड देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर



बावनकुळे यांनी दिली. ते जालना शहरातील भाजपाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ वीर सावरकर चौक व छत्रपती संभाजी महाराज उद्यान (मोतीबाग) येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते.यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा जालना महानगरपालिका निवडणूक प्रभारी रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. संतोष पाटील दानवे, महानगरपालिका निवडणूक प्रमुख **पान २ वर**

# स्वच्छ आणि सुंदर जालन्यासाठी पंजाला साथ द्या; खा. कल्याण काळे यांचे आवाहन

**लोकनायक वृत्तसेवा**

प्रभाग क्रमांक ६ च्या सर्वांगीण विकासासाठी महाविकास आघाडीचे संजय मुथा यांच्यासह चारही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज केले. काँग्रेस उमेदवार संजय मुथा, कमलाबाई भुरेवाल, इफत सलमान खान आणि नजीब अहमद मोहम्मद यांच्या प्रचारार्थ आयोजित रॅलीत खा. कल्याण



काळे यांच्यासह काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रशीद पैलवान, राजेंद्र राख, आतिक भाई तसेच व्यापारी, उद्योजक, काँग्रेसचे पदाधिकारी आणि नागरिक हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान खासदार **पान २ वर**

**सुचना**

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोण-तीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दूल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com